

# भुयारी मेट्रो वेगात

मेट्रो टनेलिंगच्या खोदकामासोबतच मेट्रो स्थानकांचे बेसस्लॅब टप्प्याटप्प्याने पूर्ण करत मेट्रो स्थानकाला आकार देण्याचे कामही वेगाने सुरू आहे. सद्यस्थितीत या मार्गावरील भूमिगत मेट्रो स्टेशनच्या बेस स्लॅबचे ७० टक्के काम पूर्ण झाले आहे.

➤ वृत्त...२

# भुयारी मेट्रो वेगात

## श्रमिक परतल्यास पुढील कामास गती मिळण्याची आशा

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

मेट्रो टनेलिंगच्या खोदकामासोबतच मेट्रो स्थानकांचे बेसस्लॅब टप्प्याटप्प्याने पूर्ण करत मेट्रो स्थानकाला आकार देण्याचे कामही वेगाने सुरू आहे. सद्यस्थितीत या मार्गावरील भूमिगत मेट्रो स्टेशनच्या बेस स्लॅबचे ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. मात्र मुंबईतील बहुप्रतीक्षित कुलाबा-वांद्रे-सिप्झ (मेट्रो ३) या भुयारी मेट्रो प्रकल्पाला करोनाचा पर्यायाने श्रमिक मूळगावी परतण्याचा फटका बसला आहे. यामुळे हा प्रकल्प किमान सहा महिने मागे जाण्याची भीती जाणकारांकडून व्यक्त केली जात आहे. मात्र, प्राप्त परिस्थितीचा प्रत्यक्ष कामावर अधिक परिणाम होणार नाही याची काळजी मुंबईत मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून (एमएमआरसी) घेतली जात आहे.



- ७० टक्के स्लॅबचे काम पूर्ण
- रस्त्यावरील कोंडी हटल्याचा फायदा
- मात्र सहा महिने विलंबाची भीती

### १५ हजार कामगार कार्यरत

भुयारी मेट्रो-३चा विचार करता यासाठी येथे एकूण १५ हजार कामगार काम करीत आहेत. मात्र, करोनामुळे यापैकी किती कामगार मूळगावी गेले याची अधिकृत माहिती अद्याप मिळालेली नाही. मात्र, चार हजार कामगार प्रत्यक्ष प्रकल्पस्थळी असल्याचे कळते आहे. लॉकडाउनचा परिणाम पाहता यापूर्वी महिन्याला एक लाख मेट्रिक टन माती बाहेर काढली जात. हे प्रमाण ४३ हजार इतके झाले आहे. तर एका महिन्यात किमान एक हजार पाचशे मीटर बोगदा खणला जात होता. मात्र, आता हे प्रमाण ३३० मीटरवर आले आहे. स्लॅबच्या कामाचा विचार करता हे काम १६ हजार चौरस मीटरवरून ४,७००वर आल्याचे कळते आहे.

भूमिगत मेट्रो दाटीवाटीच्या भागातून जात असल्याने काही स्थानकांच्या बेस स्लॅबच्या बांधकामांना वाहतूककोंडीचा सामना करावा लागत होता. मात्र, लॉकडाउन जाहीर होताच मुंबईच्या रस्त्यांवरील गर्दी ओसरल्याने या कामाने वेग धरला होता. मात्र, त्यानंतर पुन्हा एकदा प्रकल्पाला श्रमिक गळतीचे ग्रहण लागले. सध्या चार हजार कामगारांच्या मदतीने पुन्हा काम सुरू करण्यात आले आहे. तसेच श्रमिकांचा तुटवडा भरून काढण्यासाठी भरतीची जाहिरातही देण्यात आली आहे.

एमएमआरसीने केलेल्या ट्विटनुसार मेट्रो-३ अंतर्गत येणाऱ्या सिप्झ स्थानकाचे ६५ टक्के तर मरोळ नाका व विधानभवन स्थानकाच्या छतांचे प्रत्येकी ७३ टक्के काम पूर्ण झाले आहे. तर अप-डाउन मार्ग मिळून एकूण ५५ किलोमीटर लांबीच्या बोगद्यापैकी तब्बल ८५ टक्के बोगदा खोदून पूर्ण करण्यात आला आहे. इतकेच नव्हे तर मेट्रो स्थानकांवरील कामांनी देखिल हळुहळू वेग धरण्यास सुरुवात केली आहे. यापैकी एमआयडीसी स्थानकाचे ७१ टक्के, मरोळ नाका स्थानकाचे ६७ टक्के, विधानभवन स्थानकाचे ६५ टक्के व सिप्झ स्थानकाचे ५८ टक्के काम पूर्ण झाले आहे. लवकरच या मार्गावर रुळ बसविण्याचे काम सुरू होणार आहे. हे काम लार्सन अँड टुब्रो लिमिटेडकडे सोपवण्यात आले आहे.